अग्रलेखांचा नवाकाळ बादशहा

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवाकाळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवाकाळ बादशहा

# वैद्यकीय भ्रष्टाचाराची आता जागतिक पातळीवर निंदा

वैद्यकीय क्षेत्रातील भ्रष्टाचार कमी होण्याची चिन्हे दिसत नाहीत. ज्या क्षेत्राकडे लोक आदराने बघत होते तिथे आज बाजारूपणा शिरला आहे. डॉक्टर लोकांना मिळणारे कमिशन त्यातून रुग्णांची होणारी कुतरओढ हा अत्यंत घृणास्पद प्रकार सध्या या क्षेत्रामध्ये बोकाळला आहे. अलीकडे ब्रिटीश मेडिकल जनरलमध्ये भारतीय वैद्यकीय क्षेत्रातील भ्रष्टाचाराविषयी डॉ. समिरन नंदी यांनी एक लेख लिहिला होता. आणि त्याच विषयावर याच मासिकाने संपादकीय लिहून भारतातल्या वैद्यकीय भ्रष्टाचारावर आणखी प्रकाशझोत टाकला. त्यांनी 'करप्शन इन इंडियन मेडिसीन' या शिर्षकाखाली एक लेख लिहून डॉक्टरांना मिळणारे कमिशन ज्याला वैद्यकीय क्षेत्रामध्ये 'कट' हा शब्द वापरला जातो. वैद्यकीय भ्रष्टाचार इतक्या मोठ्या प्रमाणात वाढला आहे की, रुग्णाच्या आजारापेक्षा डॉक्टरांचा हा भ्रष्टाचारी इलाज धोकादायक ठरू लागला आहे. डॉ. समिरन नंदी हे भारतातले प्रथितयश गॅस्ट्रोइंट्रोलॉजिस्ट आहेत. त्यांचे असे म्हणणे आहे की, वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये देणग्या देण्यापासून या भ्रष्टाचाराला सुरुवात होते. लाखो रुपये खर्चून डॉक्टरकीचे स्वप्न पाहणारा हा माणूस डॉक्टर झाल्यावर अक्षरशः पैसे कमावण्यासाठी वाटेल त्या मार्गाचा अवलंब करतो. त्याला वेगवेगळ्या लॅबोरेटरिजकडून, औषध कंपन्यांकडून आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे कॉर्पोरेट किंवा पंचतारांकीत रुग्णालयांकडून मिळणारे लाखो रुपयांचे कमिशन असंवेदनशील बनवत असल्याचे आढळून येते. काही दिवसापूर्वीच मुंबईतल्या एका प्रसिध्दी रुग्णालयाने अनेक डॉक्टर्सना पत्र लिहून आपल्याकडे रुग्ण पाठवण्यासाठी आपण किती कमिशन देऊ याचाच धडधडीत उल्लेख केला होता. जवळपास एका मोठ्या पेशंटमागे एक ते दीड लाख कमिशन देण्याची तयारी या पंचतारांकीत रुग्णालयाने दाखवली. हे रुग्णालय एका मोठ्या उद्योगपतीच्या नावाने चालवले जाते. रुग्णालयाच्या या पत्राविषयी महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलकडे तक्रारही केली. या घटनेच्या पार्श्वभूमीवर नंदी यांचा लेख ब्रिटीश जनरलमध्ये प्रसिध्द व्हावा हा केवळ योगायोग ठरत नाही, तर आता वैद्यकीय क्षेत्र हे कसे भ्रष्टाचाराचे आगार बनत आहे, याचे ते निदर्शक ठरते. रुग्णाला माणूस म्हणून वागणूक देण्यापेक्षाही तो डॉक्टर किंवा रुग्णालय यांच्या तावडीत सापडलेला एक गिऱ्हाईक आहे. मग त्याचे शक्य तितके आर्थिक शोषण करून घेण्याचा सर्वतऱ्हेने प्रयत्न केला जातो. आज सामान्य रुग्णाला लक्षातही येणार नाही अशा वेगवेगळ्या पध्दतीतून लुटण्याचे प्रयत्न होतात. कोणतेही कारण नसताना वेगवेगळ्या प्रकारच्या चाचण्या आणि तपासण्या करण्याची सक्ती केली जाते. केवळ या चाचण्यांपोटी सामान्य रुग्णाला पाच दहा हजाराचा फटका बसतो. परंतु यातले पंचवीस टक्के कमिशन हे डॉक्टरच्या खिशात जात असते.

## रुग्णाचे शरीर म्हणजे खेळणे

गेल्या वर्षभरापासून भारतातल्या वैद्यकीय क्षेत्रातल्या या बाजारुपणाची आता जागतिक स्तरावर चर्चा होत आहे. ही केवळ आता चर्चा राहिली नसून डॉक्टर आणि रुग्णालयांच्या भ्रष्टाचारी कार्यपध्दतीची जागतिक स्तरावर निंदानालस्ती होऊ लागली आहे. 'रुग्णसेवा ही एक ईश्वरसेवा आहे,' अशा प्रकारचा फार मोठा तत्त्वविचार फक्त भारतात मांडला गेला. परदेशामध्ये त्याच्याविरुध्द परिस्थिती निर्माण झाली. अमेरिकेसारख्या देशात तर मेडिक्लेमच्या माध्यमातून रुग्णाला वस्तू म्हणूनच वागवले जाते. ज्याचा जास्तीत जास्त मेडिक्लेम असेल त्याला तशा प्रकारच्या वैद्यकीय सुविधा दिल्या जातात आणि त्यातली जवळपास निम्मी रक्कम ही कमिशन म्हणून वाटली जाते. अलीकडेच अमेरिकेमध्ये एक सर्व्हेक्षण झाले. त्यात हृदयरोगाच्या भीतीपोटी केले जाणारे स्टॅंटिंग हे कसे अनावश्यक असते याच्यावर प्रकाश टाकला गेला. अमेरिकेतल्या मोठ्या ऐंशी रुग्णालयांमध्ये तब्बल दहा हजार रुग्णांचे सर्व्हेक्षण करून हा निष्कर्श काढला गेला. छातीमध्ये दुखू लागल्याचे कारण पुढे येताच डॉक्टर मंडळी त्या रुग्णाला अतिशय घाईघाईने एंजोग्राफी करायला तर सांगतातच, परंतु छोट्या-मोठ्या ब्लॉकेजेसचे कारण पुढे सांगून तातडीने एंजोप्लास्टीचाही आग्रह धरतात. अलीकडे इलेक्ट्रॉनिक पध्दतीने केवळ पंधरा मिनीटे ते अर्धा तासाच्या आत हृदयाजवळच्या नलिकांमध्ये तातडीने स्टॅंटिंग केले जाते. ज्याची कोणतीही विशेष गरज नसल्याचे या अभ्यासामध्ये आढळून आले. भारतामध्येसुध्दा याच पध्दतीचा सर्रासपणे वापर होत आहे. गरज नसताना केवळ हृदयरोग होण्याच्या भीतीचा गैरफायदा घेऊन डॉक्टरमंडळी अशा प्रकारचा गैरव्यवहार करीत आहेत. सध्या भारतात तर हृदयरोग होण्याचे प्रमाणही वाढल्याचे सांगितले जाते. परंतु गॅसेसमुळे छातीत दुखण्याचे कारणसुध्दा डॉक्टरांना हे स्टेंटिंग करण्यासाठी पुरेसे ठरते. आणि त्यांच्या हातात सापडलेल्या रुग्णाच्या खिशाला पाच-दहा लाखांचा सहज चुना लावला जातो. म्हणजे साध्या पॅथेलॉजिकल लॅबोरेटरीजमधून ते वेगवेगळ्या मोठ्या शस्त्रक्रियांपर्यंत रुग्णालय आणि डॉक्टरांकडून कोणतीही नैतिक बंधने पाळली जात नाहीत. आवश्यकता असेल तरच शस्त्रक्रिया करण्याचा किंवा चाचण्यांचा सल्ला डॉक्टरांनी द्यायला हवा. परंतु एवढीसुध्दा नैतिकता दाखवली जात नाही. उलट चाचण्या आणि छोट्या-मोठ्या शस्त्रक्रीया या इतक्या बेधडकपणे केल्या जातात की, जणुकाही रुग्णाचे शरीर एखादे खेळणे आहे अशा पध्दतीने त्याची हेळसांड होत असते.

## डॉक्टरांचे परदेश दौरे

दोन वर्षांपूर्वीच रायगड जिल्ह्यातील एका डॉक्टरांनी त्यांना मिळालेल्या कमिशनच्या विरोधात जोरदार आघाडी उघडली होती. ज्या पुण्याच्या स्कॅनिंग सेंटरने जे कमिशन पाठवले होते ते परत तर केलेच, परंतु ते पैसे संबंधित रुग्णाला परत करायला लावले. त्यानंतर त्यांनी एकापाठोपाठ काही लेख लिहून चालणाऱ्या या कमिशनबाजीवर चौफेर हल्ला चढवला होता. अलीकडे औषध कंपन्यासुध्दा डॉक्टरांनी आपल्या औषधाचा प्रचार करावा म्हणून मोठमोठी आमिषे दाखवत असतात. अनेक डॉक्टरांचे परदेश दौरे औषध कंपन्यांकडून आयोजित होतात. मग त्या औषधाची रुग्णाला आवश्यकता नसताना जबरदस्तीने ती त्याच्या माथी मारण्याचे प्रकार होतात. खरे तर रुग्णाच्या जिवाशी खेळ खेळण्याचाच हा अधमपणा ठरतो. कॉर्पोरेट रुग्णालयांनी तर रुग्ण मिळवण्यासाठी मार्केटिंगच सुरू केले आहे. डॉक्टरांना कमिशन देण्याबरोबरच अनेक रुग्णालयांमध्ये रुग्ण आणण्याचे काम अनेक दलाल करताना आढळून येतात. ज्यांचा या वैद्यकीय क्षेत्राशी सुतराम संबंध नसतो. वेगवेगळ्या रुग्णालयात एकाच उपचारासाठी घेतल्या जाणाऱ्या शुल्कातही हा भ्रष्टाचार दडलेला असल्याचे स्पष्टपणे आढळून आले आहे.